# भारतीय राजकीय विचार

## रविंद्रनाथ टागोर

### राष्ट्रवाद

#### शतकाचा सूर्यास्त

पश्चिमेकडील लाल रंगाच्या ढगांमध्ये
आणि तिरस्काराच्या वावटळीमध्ये
या शतकाचा अखेरचा सूर्य मावळत आहे.
राष्ट्राच्या स्वार्थप्रेमाचा नागवा मनःक्षोभ
लालसेना झिंगलेल्या उन्मादात,
हत्यारांच्या संघर्षात नाचत आहे
आणि सूडाच्या काव्यपंक्तीवर
आक्रंदत आहे.

रवींद्रनाथ केवळ साहित्यिक नव्हते - ते मानवतेच्या रक्षणार्थ साधना करणारे एक तपस्वी होते.

१९ व्या शतकाला निरोप देताना (३१ डिसेंबर १८९९) रविंद्रनाथ टागोरांनी ही कविता लिहीली. रवींद्रनाथ टागोर राष्ट्रवादावर टीका करीत होते. तरी स्वतंत्र भारताचे राष्ट्रगीत म्हणून रवींद्रनाथांच्या कवितेची निवड करण्यात आली. बांग्लादेशानेसुध्दा टागोरांच्या आमार सोनार बांगला या गीताची राष्ट्रगीत म्हणून निवड केली. रवींद्रनाथ हे असे एकमेव कवी आहेत ज्यांच्या कविता दोन देशांनी राष्ट्रगीत म्हणून स्वीकारल्या.

पश्चिमेकडे राष्ट्रवाद उदयाला आला त्याचेच रुपांतर पुढे साम्राज्यवादामध्ये झाले. यावरून तेथिल राष्ट्रवाद अमानवी, युध्द, शस्त्र, हिंसा यांचा प्रचार करणारा होता हे सिध्द होते असे ते म्हणतात. राष्ट्रवादातून उदयाला आलेल्या साम्राज्यवादाने भारताचे अधःपतन केले, नैतिकतेचा ऱ्हास केला, भारताला गुलाम केले असेही त्यांचे मत होते.

राष्ट्र ही औद्योगिक भांडवलशाहीच्या उदयानंतर स्थापन झालेली एक राजकीय आणि व्यापारी संघटना आहे. ती यांत्रिक आहे. तिच्यात अपार शक्ती आहे. त्या शक्तीचा विध्वंसक कामासाठी वापर होतो. राष्ट्रा-राष्ट्रांमधील संघर्ष वाढीस लागतात. माणसातील नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांचा ऱ्हास होतो. त्याच्या जागी राजकीय आणि व्यापारी मूल्ये स्वार होतात. सत्ता काबीज करणे आणि नफा मिळवणे हेच माणसाचे उद्दीष्ट बनते. राष्ट्र माणसापेक्षा श्रेष्ठ होत जाते आणि मानवतेच्या मूळ तत्वावरच हल्ला करते. ब्रिटीश साम्राज्यवादाने राष्ट्रवादाच्या गोंडस नावाखाली भारताला आणि इतर

संपन्न देशांना आपल्या नियंत्रणाखाली आणले. त्यामागे त्यांचा हेतू या देशांची लूट करून आपल्या राष्ट्राला संपन्न करणे हा होता.

राष्ट्रवादाच्या उन्मादातून पहिले महायुध्द सुरु झाले. पहिल्या महायुध्दाच्या दरम्यान रवींद्रनाथांनी जपान - अमेरिकेचा दौरा केला आणि राष्ट्रवाद या विषयावर व्याख्याने दिली. त्यामध्ये त्यांनी राष्ट्रवाद विरोधी मांडणी केली. अमेरिकनांनी राष्ट्रवाद सोडून द्यावा असे ते म्हणाले. त्यामुळे अमेरिकेत त्यांच्याविरुध्द टीका झाली.

गेल्या तीन शतकांपासून राष्ट्रवाद विषयक चर्चा चालू आहे. बाजारपेठेच्या अर्थ व्यवस्थेमधून राष्ट्र आणि राष्ट्रवादाची निर्मीती झाली अशी मांडणी साधारणपणे केली जाते. कार्ल मार्क्सने ठामपणे याचे समर्थन केले.

भारतात राष्ट्रवादविषयक चर्चा प्रामुख्याने झाली ती राष्ट्रीय चळवळीच्या दरम्यान. राष्ट्रीय चळवळीतील सर्वच नेत्यांनी भारतीय समाजात राष्ट्रीय भावना प्रेरित करून त्याचे उदात्तीकरण केले. परंतु रवींद्रनाथ टागोरांनी राष्ट्रवादासंदर्भात अत्यंत सडेतोड भूमिका घेऊन सातत्याने टीका केली. राष्ट्रवादातून हिंसा, युध्द, विघटन, संशय यांचा जन्म होतो आणि तो मानवतेला एक शाप आहे.

रवींद्रनाथांच्या जन्मावेळी बंगालमध्ये राष्ट्रीय चळवळीची सुरवात झाली. त्यांच्यावर या चळवळीचा प्रभाव पडला. त्यांनी या चळवळीमध्ये काही प्रमाणात भागही घेतला. त्यांची राष्ट्रभक्ती त्यांच्या साहित्यातूनही व्यक्त होत राहिली. १९०५ मध्ये झालेल्या बंगालच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी स्वदेशी चळवळीत सहभाग घेतला. राष्ट्रीय सभेमध्ये म्हणजेच काँग्रेसमध्येही ते सक्रीय होते. सुरत अधिवेशनामध्ये झालेल्या जहाल मवाळ संघर्षाने ते दुःखी झाले होते. जहाल आणि मवाळ गटांमध्ये समझोता झाला पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. त्याचप्रमाणे बंगालमधील क्रांतीकारी गटांनी हिंसेचा मार्ग सोडून दिला पाहिजे कारण तो मार्ग भारतीय परंपरेशी जुळणारा नाही असे त्यांचे मत होते. रवींद्रनाथांची विश्वात्मकतेवर अढळ निष्ठा होती. स्वदेशी चळवळीमध्ये हिंसेचा वापर होऊ लागला त्यामुळे ते विषण्ण झाले आणि त्यांनी सक्रिय राजकारणाचा त्याग केला. अर्थात साहित्याच्या माध्यमातून ते आपले देशप्रेम व्यक्त करीत राहिले. जालिवानवाला बाग हत्याकांडाचा त्यांनी निषेध केला. ब्रिटीशांनी दिलेला 'नाईट' किताब त्यांनी परत केला.

रवींद्रनाथ टागोर हे राष्ट्रवादी नव्हते. ते देशप्रेमी होते. पण त्याहीपेक्षा मानवतावादी होते. ते एके ठिकाणी म्हणतात - "देशभक्ती हे माझे अंतिम अध्यात्मिक साध्य नाही. मानवतावादामध्येच अंतिम सुख आहे. मी हिऱ्याच्या किमतीत काच विकत घेणार नाही आणि जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत मानतेवर देशप्रेमाला स्वार होऊ देणार नाही."

रवींद्रनाथ राष्ट्रवादावर टीका करीत असले तरी भारताचे एक वेगळे अस्तित्व आहे. ते भारतीयांनी टिकवले पाहिजे असे म्हणत असत.

विविधतेतून एकता साधत भारतीय समाजाची बांधणी झाली आहे. इतिहासात भारतीय संस्कृतीचे हे वैशिष्ट्य राहिले आहे. भारतीय संस्कृती सर्वांना सामावून घेणारी आहे. अनेक राजसत्ता आल्या आणि

गेल्या परंतु भारतीय समाज आणि संस्कृती टिकून राहिली आहे. भारतीयांनी पाश्चिमात्यांचे अनुकरण न करता आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवावे. या देशाच्या स्वातंत्र्याची उभारणी सामाजिक पुनर्रचनेतूनच होऊ शकते, नैतिक आणि आध्यात्मिक स्वातंत्र्यातून होऊ शकते असे टागोरांचे मत होते.

आपण इतर लोकांचे इतिहास उसने घेऊ शकत नाही. आपल्या जीवनाशी संबंधित नसलेल्या गोष्टी आपण इतरांकडून उसन्या घेतो तेव्हा आपण आपले आयुष्य चिरडून टाकतो. जे भौतिकदृष्ट्या नव्हे तर नैतिकदृष्ट्या समृध्द असतात त्यांच्यासाठीच भविष्यकाळ असतो.

टागोर भूतकाळाच्या गौरवीकरणावर टीका करतात. जे लोक भूतकाळाचे गौरवीकरण करतात ते प्रतिगामी आहेत असे ते म्हणतात.

जपानने पाश्चिमात्यांकडून शास्त्रे घेतली परंतु आपली संस्कृती टिकवली. भारतीयांनी जपानचे उदाहरण डोळ्यांपुढे ठेवावे असे ते म्हणतात.

आपले घर, आपली मंदिरे, आपली गुरुकुले, साध्यासोप्या कायद्याच्या आधारे गावाचा कारभार करणारी स्वयंशासने एवढ्यापुरतेच भारतीयांचे जीवन मर्यादित होते. इथे राज्यकर्ते कोण आहेत याच्याशी त्यांचा संबंध नव्हता. परंतु यावेळी पश्चिमेकडून आलेले राष्ट्र आपला अजस्त्र फाळ भारताच्या भूगर्भात खोल रुतवत आहे. यावेळी आपला मुकाबला राजांशी किंवा एखाद्या वंशाशी नसून तो राष्ट्राशी आहे. रवींद्रनाथ राष्ट्र संकल्पनेचे विरोधक होते. राष्ट्रवादातून पाशवी सामर्थ्य आणि यांत्रिक कार्यक्षमता निर्माण होते.

गोरा, घरे बैरे आणि चार अध्याय या तीन कादंबऱ्यांमधून त्यांनी आपले विचार प्रकट केले. तसेच १९१६ साली दिलेल्या तीन व्याख्यानांमधून - पश्चिमेकडील राष्ट्रवाद, जपानमधील राष्ट्रवाद आणि भारतातील राष्ट्रवाद त्यांनी आपले विचार मांडले. ही तीन व्याख्याने राष्ट्रवाद या शीर्षकाखाली पुस्तकरुपाने प्रकाशित झाली.

संदर्भ

1. http://tagoreweb.in/
2. रवींद्रनाथ टागोरांचे राष्ट्रवादविषयक विचारः एक आकलन
   प्रा. डॉ. भारती पाटील
   समाज प्रबोधन पत्रिका क्र. १९५ जूलै-सप्टेंबर २०११
   पृ. क्र. ३६ - ४०.